**Secondary Education Society's**

# Arts and Science College, Bhalod
# Taluka-Yawal, Dist- Jalgaon 425304

**NAAC Reaccredited "B" Grade**

**E-mail: ascbhalod@gmail.com, Web: ascbhalod.ac.in. Ph.Office: +91-02585- 242229. Fax: +91-02585-242411**

# National Service Scheme
## (Academic Year 2021-2022)

**Date: 26/07/2021**

## राष्ट्रीय सेवा योजना एककाच्यावतीने वृक्षारोपणाचा कार्यक्रम
(Tree Planation)

दि. **२६/०७/२०२१** रोजी सेकंडरी एज्युकेशन सोसायटी संचलित कला व विज्ञान महाविद्यालयात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. ए. एस. कोल्हे यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे आयोजित या वृक्षारोपण कार्यक्रमास माजी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. के.जी.चौधरी,डॉ. डी.एच.पाटील, डॉ. वर्षा नेहेते तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ.पी.ए.सावळे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. डी.आर.महाजन, महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. मीनाक्षी वाघुळदे आदींच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या वृक्षारोपण कार्यक्रमात **निम, शिसम, हिरडा, बेहडा, अर्जुन, मेडसिंग, बेल व टेट** इत्यादी वृक्षांची लागवड महाविद्यालयाच्या परिसरात करण्यात आली.














## भालोद महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न

लेवा जगत  जुलै ३१, २०२१  0

भालोद महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न

**भालोद प्रतिनिधी:**-सेकंडरी एज्युकेशन सोसायटी संचलित कला व विज्ञान महाविद्यालयात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. ए. एस. कोल्हे यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला.महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे आयोजित या वृक्षारोपण कार्यक्रमास माजी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. के. जी. चौधरी ,डॉ. डी.एच.पाटील, डॉ. वर्षा नेहेते तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ.पी.ए.सावळे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. आर. महाजन, महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. मीनाक्षी वाघुळदे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ.जे. एस.मेढे ,डॉ.एस.एम. नेवे ,डॉ.जी.आर. चौधरी, डॉ. व्ही.पी.पवार, डॉ.डी.ए. खोब्रागडे, प्रा.आर. पी. चौधरी, प्रा. मोहिनी तायडे, बी. आर. परतणे ,डी. टी. इंगळे आदींच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.या वृक्षारोपण कार्यक्रमात निम, शिसम, हिरडा, बेहडा, अर्जुन, मेडसिंग, बेल व टेट इत्यादी वृक्षांची लागवड महाविद्यालयाच्या परिसरात करण्यात आली.या कार्यक्रमास कल्याण चौधरी , किशोर चौधरी, टी. आर. पाटील , सि. टी. लोखंडे व निलेश सपकाळे आदींचे सहकार्य लाभले.

Subscribe for Latest Updates
Subscribe
FACEBOOK
Saptahik Lewajagat
502 likes
Like Page
Send Message
मराठी लेख | मराठी कविता | प्रतिक्रिया
मुंबई पोलीस "वॉरियर की वरियर" : सोनाली शिराळकर*
July 06, 2021  0
फालुन दाफा : मन आणि शरीरासाठी एक संपूर्ण साधना
June 21, 2021  0
जगभराचे लक्ष वेधून घेणारे हे हत्ती 500 कि.मी चालून नेमके जात कुठे आहेत
June 13, 2021  0



## भालोद महाविद्यालयात वृक्षारोपण

**Date: 09/08/2021**

# जागतिक आदिवासी दिननिमित्त 'आदिवासी जमातीच्या समस्या' विषयावर व्याख्यानाचे आयोजन

राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि. **०९/०८/२०२१** रोजी **"जागतिक आदिवासी दिन"** निमित्त महाविद्यालयातील ग्रंथपाल डॉ. डिगांबर खोब्रागडे यांचे **'आदिवासी जमातीच्या समस्या'** या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.ए.एस्.कोल्हे हे होते.














# भालोद महाविद्यालयात जागतिक आदिवासी दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**

**भालोद, ता.यावल, १० ऑगस्ट**

सेकंडरी एज्युकेशन सोसायटीचे कला व विज्ञान महाविद्यालय भालोद येथे जागतिक आदिवासी दिन आयोजित करण्यात आला. महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने आयोजित केलेल्या सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.ए.एस.कोल्हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. डि.ए.खोब्रागडे उपस्थित होते. यावेळी आपल्या मनोगतातून डॉ.खोब्रागडे यांनी आदिवासी समाजाचे प्रणेते बिरसा मुंडा यांच्या चळवळीचा वास्तव इतिहास व आदिवासी समाज, संस्कृती, आदिवासी समाजाचे वास्तव चित्रण तसेच उपाययोजना याविषयी माहिती दिली.

याप्रसंगी मनोगत व्यक्त करतांना प्र प्राचार्य डॉ. ए.एस.कोल्हे म्हणाले की, आदिवासी समाज विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न केले पाहिजे.

प्रास्ताविक रासेयो प्रमुख डॉ पी.ए.सावळे यांनी केले. सुत्रसंचालन विद्यार्थी विकास प्रमुख डॉ. दिनेश पाटील यांनी केले. आभार विद्यार्थी विकास महिला प्रमुख प्रा.मोहिनी तायडे यांनी मानले. कार्यक्रमास रासेयो रावेर विभागाचे समन्वयक डॉ. आशुतोष वर्डीकर, रासेयो महिला अधिकारी डॉ मिनाक्षी वाघुळदे आदी उपस्थित होते.


**Date: 11/08/2021**

# ११ ऑगस्ट २०२० विद्यापीठ नामविस्तार दिवस निमित्त ' नामविस्ताराची त्रिवर्ष पूर्ती ' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन

राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे बुधवार दि. **११/०८/२०२१** रोजी **"११ ऑगस्ट २०२० विद्यापीठ नामविस्तार दिवस"** निमित्त महाविद्यालयातील राजशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. सुनिल नेवे यांचे ' **नामविस्ताराची त्रिवर्ष पूर्ती** ' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. हे व्याख्यान Zoom meeting वर Online पध्दतीने घेण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.ए.एस्.कोल्हे हे होते.








देशदूत 17 ऑगस्ट 2021

**प्रत्येक महाविद्यालयात कवयित्री बहिणाबाई चौधरी अध्यासन केंद्र असावे - प्रा. डॉ. सुनील नेवे**

**Date: 12/08/2021**

# १ ते १५ ऑगष्ट या कालावधित स्वच्छता पंधरवाडा साजरा करणे निमित्त 'स्वच्छ भारत सुंदर भारत' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन

राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे गुरुवार दि. **१२/०८/२०२१** रोजी " **१ ते १५ ऑगष्ट या कालावधित स्वच्छता पंधरवाडा साजरा करणे** " निमित्त श्री. व्ही. एस्. नाईक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय रावेर येथील मराठी विभागाचे प्रमुख व माजी NSS विभागीय समन्वयक, रावेर विभाग **प्रा. डॉ. जी. आर. ढेंम्बरे** यांचे **'स्वच्छ भारत सुंदर भारत'** या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. हे व्याख्यान Zoom meeting वर (Online) आभासी पध्दतीने घेण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. ए. एस्. कोल्हे हे होते.
















दै. देशदूत 29 ऑगस्ट 2021 रविवार पान नं 8

## व्यक्तिगत स्वच्छतेपेक्षा सामूहिक स्वच्छता महत्त्वाची- प्रा. डॉ. ढेंबरे

भालोद, ता. यावल । वार्ताहर

सेकंडरी एज्युकेशन सोसायटी संचलित कला व विज्ञान महाविद्यालय भालोद येथे राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने १ ते १५ ऑगष्ट या कालावधीत स्वच्छता पंधरवाडा व आंतरराष्ट्रिय युवक दिवसा निमित्त आयोजित कार्यक्रमात म स्वच्छ भारत सुंदर म या विषयावर बोलतांना प्रा.डॉ. गणपतराव ढेंबरे यांनी वरील प्रतिपादन केले. हा कार्यक्रम झुम मिटींगद्वारे आभासी पध्दतीने घेण्यात आला.

कोविड-१९ विषाणूचा प्रार्दुभाव पाहता विद्यार्थ्यांनी स्वतः व कुटुंबातील सदस्यांनी स्वच्छतेला किती महत्व दिले पाहिजे हे विषद केले. स्वच्छता पंधरवाडा निमित्त कोविड-१९ च्या शासन नियमांचे काटेकोरपणे पालन करून रासेयो स्वंयसेवकांनी आपल्या घराची, अंगणाची, परिसराची व गल्लीची स्वच्छता करावी व स्वच्छतेचे महत्व कुटुंबातील सदस्यांना व वाड्यातील लोकांना समजावून सांगावे असे आव्हान त्यांनी केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. ए.एस. कोल्हे हे होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. पी. ए. सावळे यांनी केले. अध्यक्षीय भाषण प्रभारी प्राचार्य डॉ. ए. एस. कोल्हे यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. मिनाक्षी वाघुळदे यांनी केले तर आभार प्रदर्शन रासेयो सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. डी.आर. महाजन यांनी केले.या आभासी कार्यक्रमास रासेयो रावेर विभागाचे समन्वयक प्रा.डॉ. ए.आर. वर्डिकर, महाविद्यालयातील प्राध्यापक बंधुभगिनी, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते.

**Date: 14/08/2021**

# 'कवयित्री बहिणाबाई ज्ञान वर्ग: विद्यापीठाची संकल्पना ' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन

राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे शनिवार दि. **१४/०८/२०२१** रोजी रा.से.यो.स्वंयसेवकां मार्फतटाळे बंदी (Lockdown) कालावधित ' **कवयित्री बहिणाबाई ज्ञान वर्ग** ' मोहिम राबविण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनींनमध्ये सामाजिक जाणिव जागृती निर्माण व्हावी यासाठी महाविद्यालयातील मराठी विभागाचे प्रमुख **प्रा.डॉ.जे.एस्.मेढे** यांचे '**कवयित्री बहिणाबाई ज्ञान वर्ग: विद्यापीठाची संकल्पना** ' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. हे व्याख्यान Zoom meeting वर (Online) आभासी पध्दतीने घेण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.ए.एस्.कोल्हे हे होते.












दै देशदूत 30 ऑगस्ट 2021 सोमवार पेज नं 5

## समाजापेक्षा देश मोठा- प्रा.मेढे

▸▸ भालोद, ता. यावल ।

**Date: 09/09/2021**

# भालोद महाविद्यालयात ‘आझादी का अमृत महोत्सव’ या उपक्रमा अंतर्गत ‘ फिटनेस की डोस आधा घंटा रोज ’ हा कार्यक्रम संपन्न

कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद येथे **आझादी का अमृत महोत्सव** या उपक्रमा अंतर्गत ‘**फिटनेस की डोस आधा घंटा रोज**’ ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजना विभाग व शारिरीक शिक्षण व क्रिडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात दि. **०९/०९/२०२१** रोजी **प्रा. डॉ. मुकेश पवार** यांनी फिटनेस संदर्भात उपस्थितांना जॉगिंगचे प्रशिक्षण दिले व मार्गदर्शन केले. आपली प्रतिकार शक्ती उत्तम ठेवण्यासाठी प्रत्येकाने दररोज किमान अर्धातास चालणे, धावणे, जॉगिंग करणे, प्राणायाम करणे, सायकल चालवणे इ. सवयी दैनंदिन आयुष्यात अवलंबणे किती महत्त्वाचे आहे ते विषद करून सांगितले. **फिटनेस की डोस आधा घंटा रोज हा खुप महत्वाचा व निरोगी आयुष्याचा मंत्र आहे तो प्रत्येकाने अंगिकारावा व निरामय जीवन जगावे असे आहवान त्यांनी उपस्थितांना केले.** सदर उपक्रम महाविदयालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. ए. एस्. कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.












दैनिक देशदूत 20/09/2021 पान नं 7



# भालोद महाविद्यालयात आझादी का अमृत महोत्सव

## उपक्रमांतर्गत फिटनेससंदर्भात मार्गदर्शनपर कार्यक्रम

भालोद, ता.रावेर । वार्ताहर

सेकंडरी एज्युकेशन सोसायटी संचलित,कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद येथे आझादी का अमृत महोत्सव या उपक्रमा अंतर्गत फिटनेस की डोस आधा घंटा रोज ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजना विभाग व शारिरीक शिक्षण व क्रिडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

प्रा.डॉ. मुकेश पवार यांनी फिटनेस संदर्भात उपस्थितांना योगाचे प्रशिक्षण दिले व मार्गदर्शन केले. आपली प्रतिकार शक्ती उत्तम ठेवण्यासाठी प्रत्येकाने दररोज किमान अर्धा तास चालणे, धावणे, जॉगिंग करणे, प्राणायाम करणे, सायकल चालवणे इ. सवयी दैनंदिन आयुष्यात अवलंबणे किती महत्वाचे आहे हे विषद करून सांगितले. फिटनेस की डोस आधा घंटा रोज हा सुप महत्वाचा व निरोगी आयुष्याचा मंत्र आहे तो प्रत्येकाने अंगिकारावा व निरामय जीवन जगावे असे आव्हान त्यांनी उपस्थितांना केले.

सदर उपक्रम महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.ए.एस. कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.पी.ए. सावळे, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. मिनाक्षी वायुळदे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. डी.आर. महाजन व शारिरिक शिक्षण व क्रिडा विभाग संचालक प्रा.डॉ. मुकेश पवार यांनी परिश्रम घेतले.

हा कार्यक्रम कोविड-१९ पार्श्वभूमी संदर्भात जागतिक आरोग्य संघटना, केंद्र शासन, राज्य शासन व स्थानिक प्रशासन यांच्या सूचना प्रमाणे कोरोना प्रतिबंधक उपायांचे पालन करून संपन्न झाला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्रा.डॉ. सुनिल नेवे, प्रा.डॉ. दिनेश पाटील, प्रा.आर.बी. इंगळे, प्रा.एच.टी. इंगळे, प्रा. डॉ. वर्षा नेहेते, प्रा. डी.बी. चौधरी, प्रा.सी.सी. वानखेडे, प्रा.के.एस. पाटील, प्रा. डॉ.के.जी. चौधरी, प्रा.डॉ.जी.आर. चौधरी, प्रा.मोहिनी तायडे, जे.एस. झांबरे, पंकज नेहेते, रोहिदास पाटील, सी.टी. लोखंडे, निलेश सपकाळे उपस्थित होते.

# फैजपूर ये

**Date: 22/09/2021**

# भालोद महाविद्यालयात तंबाखू मुक्त जीवनाचा संकल्प

कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे तंबाखू मुक्त जीवनाचा संकल्प या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात आमचे महाविद्यालय तंबाखू मुक्त महाविद्यालय करण्याच्या दृष्टीने उपस्थितांना **तंबाखू, खर्रा, सिगारेट, ई-सिगारेट व धुम्रपान ह्यांचा दुष्पपरिणामांची जाणीव व्हावी** यासाठी जन्मभर ह्या व्यसनांपासून दूर राहण्याचे, स्वतःचे घर, घराच्या आजूबाजूचा परिसर तंबाखू मुक्त रहावा, भारत सरकारचा तंबाखू नियंत्रण कायदा लागू करण्यासाठी पुढाकार घेण्याचे तसेच **माझे गांव, माझा तालुका व माझा जिल्हा तंबाखू मुक्त बनविण्यासाठी प्रयत्न** करण्याचे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमात रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.पी.ए. सावळे यांनी उपस्थितांना **' तंबाखू मुक्त जीवनाचा संकल्प '** ही शपथ दिली. सदर उपक्रम महाविदयालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.ए.एस्.कोल्हे यांच्या अध्यक्षते खाली दि. **२२/०९/२०२१** रोजी संपन्न झाला.












देशदूत
My भुसाव
। बुधवार, दि. २९ सप्टेंबर २०२१ । पान १०।

थोडक्यात...



## भालोद महाविद्यालयात तंबाखूमुक्त जीवनाचा संकल्प

▸▸ भालोद, ता. यावल । वार्ताहर

येथील कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे तंबाखू मुक्त जीवनाचा संकल्प करण्यात आला.

या कार्यक्रमात आमचे महाविद्यालय तंबाखू मुक्त महाविद्यालय करण्याच्या दृष्टीने उपस्थितांना तंबाखू, खर्रा, सिगारेट, ई-सिगारेट व धुम्रपान ह्यांचा दुष्परिणामांची जाणीव व्हावी. यासाठी जन्मभर ह्या व्यसनांपासून दूर राहण्याचे, स्वतःचे घर , घराच्या आजूबाजूचा परिसर तंबाखू मुक्त रहावा, भारत सरकारचा तंबाखू नियंत्रण कायदा लागू करण्यासाठी पुढाकार घेण्याचे तसेच माझे गांव , माझा तालुका व माझा जिल्हा तंबाखू मुक्त बनविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले. रा. से.यो.कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.पी.ए. सावळे यांनी उपस्थितांना तंबाखू मुक्त जीवनाचा संकल्प ही शपथ दिली.

प्रभारी प्राचार्य डॉ. ए. एस.कोल्हे अध्यक्षस्थानी होते. यशस्वीतेसाठी रा.से.यो. महिला कार्यक्रम आधिकारी प्रा. डॉ. मिनाक्षी वाघुळदे, सहाय्यक कार्यक्रम आधिकारी प्रा. डॉ. डी. आर. महाजन यांनी परिश्रम घेतले. यावेळी प्रा.डॉ. जे. एस. मेढे, प्रा. मुकेश चौधरी, प्रा.डॉ. ए.आर. वर्डिकर ( रासेयो, रावेर विभाग समन्वयक), प्रा. डॉ. डी.ए. खोब्रागडे, प्रा. डॉ. सुनिल नेवे, प्रा. डॉ. दिनेश पाटील, प्रा. आर. बी. इंगळे, प्रा. इंगळे, प्रा. डॉ.वर्षा नेहेते, प्रा. डी.बी. चौधरी, प्रा. सी. व्ही. वानखेडे, प्रा.के.एस. पाटील . प्रा. डॉ. व्ही. पी. पवार, प्रा.डॉ. जी. आर. चौधरी, मुबारक तडवी, रोहिदास पाटील, सी.टी. लोखंडे, निलेश सपकाळे, विद्यार्थी- विद्यार्थीनी सहभागी झाले होते.

## पीआरसीसाठी शिक्षक रात्री उशिरापर्यंत तात्कळले

▸▸ सुनसगाव,ता.भुसावळ । वार्ताहर

जळगाव जिल्ह्यात पंचायत राज समिती तीन दिवसांच्या दौऱ्यावर आली असून भुसावळ तालुक्यात पीआरसी समिती उशिरा दाखल

# ग्रामीण भागात वाचन संस्कृती स वाचन कट्ट्याची निर्मिती - मनी

बोदवड महाविद्यालयाच्या रासेयोतर्फे दत्तक गाव हिंगणे येथे कवयित्री

▸▸ बोदवड । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये वाचन संस्कृती रुजविण्यासाठी वाचन कट्ट्याची निर्मिती महत्वाची असल्याचे सरपंचा मनिषा पाटील यांनी सांगितले

कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककाद्वारे दत्तक ग्राम हिंगणे येथे सरपंचा मनिषा पाटील यांच्या हस्ते राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिनाचे औचित्य साधून 'कवयित्री बहिणाबाई चौधरी ग्राम वाचनकट्टा' चे उद्घाटन करण्यात आले.

उद्घाटनप्रसंगी सरपंच मनिषाताई पाटील यांनी सदर वाचन कट्ट्याचा वापर सर्व गावकरी करतील असा आशावाद व्यक्त केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर अरविंद चौधरी होते. अध्यक्षीय भाषणात दत्तक गावाचा सर्वांगीण विकास व्हावा व शासनाच्या विविध योजनांचा अभ्यास करून गावाच्या विकासात, प्रत्येक गावकर्यांनी हातभार लावावा असे प्रतिपादन केले.

वाचन संस्कृती लुप्त होऊ नये



म्हणून रासेयो एककाने दत्तक गावात सदर वाचन कट्ट्याची निर्मिती केली असल्याचे मत याप्रसंगी उपस्थित प्रोफेसर किशोर पाठक यांनी व्यक्त केले.

प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. अनिल बारी यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी वाचन कट्टा निर्माण करणे गरजेचे आहे, यासोबतच वाचनकट्ट्यामध्ये गावातील लहान-थोरा पासून सर्वजण या वाचन कट्ट्याचा लाभ घेऊ शकतात. यामुळे वाचन संस्कृती समृद्ध होण्यास देखील मोठा वाव आहे असे प्रतिपादन केले.

याप्रसंगी सरपंचा मनीषा पाटील, उपसरपंच माया होडगरे, ग्रामपंचायत सदस्य अशोक पाटील, माजी सरपंच रवींद्र पाटील, मुख्याध्यापिका रजनी महाजन, रामराव पाटील, ईश्वर होडगरे, सुभाष पाटील, वैभव

पाटील,
गावाती
बहुसंखे
का
डॉ. अ
मार्गदर्श
कार्यक्र
डॉ. अ
माधव
वंदना
ईश्वर
स्वयंसे
केले.



**Date: 24/09/2021**

# भालोद महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस उत्साहात साजरा

## राष्ट्रीय सेवा योजना सर्वांगीण विकास व मूल्य शिक्षणाची संस्कार शाळा- डॉ. वर्षा नेहेते

भालोद येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे **राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस** साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग प्रमुख **प्रा. डॉ. सौ. वर्षा नेहेते** यांनी **' इतिहास राष्ट्रीय सेवा योजनेचा '** या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवसाचा इतिहास, राष्ट्रीय सेवा योजनेचे ध्येय, उदिष्ट, बोधवाक्य, राष्ट्रीय सेवा योजनेचा सिम्बॉल, रा.से.यो.ही युवकांच्या जीवनात एक संस्कार शाळा, रा.से.यो. ही एक चळवळ आहे, ती महाविद्यालयीन जीवनात दीपस्तंभा प्रमाणे काम करत असून युवकांना सामाजिक बांधिलकी व स्वावलंबन शिकविण्याचे काम करत असल्याचे ही आपल्या मार्गदर्शनपर मनोगतातून सांगितले. कार्यक्रम दि. **२४/०९/२०२१** रोजी संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविदयालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. ए. एस्. कोल्हे हे होते.हा कार्यक्रम कोविड-१९ पार्श्वभूमी संदर्भात जागतीक आरोग्य संघटना, केंद्र शासन, राज्य शासन व स्थानिक प्रशासन यांच्या सूचनां प्रमाणे कोरोना प्रतिबंधक उपायांचे पालन करून संपन्न झाला.












# रा.से.योजना मूल्यशिक्षणाची संस्कार शाळा- डॉ.वर्षा नेहेते

भालोद, ता.यावल । वार्ताहर

राष्ट्रीय सेवा योजना ही एक चळवळ आहे, ती महाविद्यालयीन जीवनात दीपस्तंभाप्रमाणे काम करत असून युवकांना सामाजिक बांधिलकी व स्वावलंबन शिकविण्याचे काम करत आहे. रा.से.योजना महाविद्यालयीन विद्यार्थांच्या सर्वांगीण विकास घडविणारे व्यासपीठ आहे असे, प्रतिपादन डॉ. वर्षा नेहेते यांनी केले.

येथील कला व विज्ञान महाविद्यालयात रा. से. यो. च्या स्थापना दिवसानिमीत्त 'इतिहास रा.से.योजने'चा या विषयांवर मार्गदर्शन करतांना त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ए. एस. कोल्हे हे होते. त्यांनी महात्मा गांधींच्या खेड्याकडे चला या उक्ती प्रमाणे खेड्यांचा शाश्वत विकास करणारी एक योजना असल्याचे अध्यक्षीय मनोगतात सांगितले. प्रास्ताविक रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. पी. ए. सावळे यांनी केले. तर सूत्रसंचालन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. दिनेश महाजन यांनी केले. आभार प्रदर्शन महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. मिनाक्षी वाघुळदे यांनी केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्रा. डॉ. ए.आर. वर्डिकर ( रासेयो रावेर विभाग समन्वयक ), प्रा. डॉ. दिनेश पाटील, प्रा.के.एस. पाटील, प्रा. राकेश चौधरी , प्रा. डॉ. सुनिल नेवे आणि रासेयो स्वंयसेवक उपस्थित होते.